जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/०९/२०२३
## दि.१४/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३०७/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२७ वर्षे,रा.संभाजीनगर (औरंगाबाद) |
| **आरोपीत** | एक रिक्षा चालक व मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/०९/२०२३ रोजी पहाटे ०२/३० वा. शंकरशेठ रोडवरील सेव्हन लव्हज चौका जवळील गोदरेज शो-रुम समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कार मधुन जात असताना,त्यांचे कारचे पुढे जाणारे रिक्षा चालकाने अचानक ब्रेक मारल्याने,फिर्यादी यांची कार रिक्षास पाठीमागुन धडकल्याने,सदर रिक्षा चालकाने त्याची रिक्षा तेथेच उभी करुन,रिक्षाचे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणुन फिर्यादी यांनी फोन-पे वरुन सदर रिक्षा चालकास ४,०००/- रु ऑनलाईन पेमेंट केले. त्यावेळी त्यांचे कारचे पाठी मागे थांबलेल्या मोटार सायकलवरील ट्रिपल सीट असलेले इसमांनी फिर्यादीचे जवळ येवुन, सदर रिक्षा चालकास पाहुन "हे आमचे चाचा आहेत,तु आम्हांस सुध्दा पैसे दे" असे म्हणुन, फिर्यादीस शिवीगाळ व हाताने मारहाण करुन,त्यातील एका इसमाने फिर्यादीचे पँटचे खिशात जबरदस्तीने हात घालुन,२०,०००/- रुपये रोख रक्कम व १५,०००/- रु किचा मोबाईल फोन जबरी चोरी करुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. राहुल जोग ८८३०५७४६९६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३०८/२०२३,भादविक ४९८(अ),३०६,५०४ |
| **फिर्यादी** | रवि आहीरे,वय-३९ वर्षे,रा.शुक्रवार पेठ,हिराबाग,पुणे |
| **आरोपीत** | एक महिला (मयताची सासु) (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/११/२०२१ ते दि.११/०९/२०२३ रोजीचे कालावधीत शुक्रवार पेठ,हिराबाग,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची भाची सौ.सायली सौरभ भागवत,वय-२२ वर्षे,रा.५५७,दत्तवाडी,पुणे हिचे तीचे पतीसोबत लग्न झाल्यापासुन,तीची सासु यातील नमुद महिला हिने सौ.सायली हिचे चारीत्र्यावर संशय घेवुन,तीला टोचुन बोलुन,टोमणे मारून,अपशब्द वापरून,तुला स्वयंपाक नीट बनवता येत नाही असे म्हणुन,तीस मानसिक व शारिरीक त्रास देवुन,उपाशीपोटी ठेवुन,तीचे नव-यापासुन अलीप्त राहण्यास भाग पाडुन,रात्री ०२/०० वा.तीस घराचे बाहेर हाकलुन दिल्याने,त्रास असहाय्य झाल्याने सौ.सायली हिस विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एल.एन.सोनवणे ९९२३६४०३०३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १८९/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५१ वर्षे,रा.आळंदी देवाची,खेड,जि.पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी इसम वय अंदाजे २० ते २५ वर्षे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०९/२०२३ रोजी १६/१५ वा.मंगला सिनेमा समोरील बस स्टॉपवर मनपा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रस्ता पेठ,पुणे येथे जाणा-या पीएमपीएमएल बस मध्ये प्रवासी म्हणुन चढत असताना,नमुद इसमाने त्यांचे जवळ येवुन,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील १२,२००/- रु किंचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शिंदे ८८८८२९७५२३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ९३९/२०२३,भादविक ३०६,४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | जाहीद खान,वय-४० वर्षे,रा.नाना पेठ,पुणे |
| **आरोपीत** | १.मयताचे पती व त्याचे इतर नातेवाईक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २००७ पासुन ते दि.१३/०९/२०२३ रोजीपर्यंत सर्वे नं.४२,अजमेरा पार्क,गल्ली नं.०६, कोंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहिण फरजीन मोसीन शेख,वय-३५ वर्षे,रा.सर्वे नं.४२,अजमेरा पार्क, गल्ली नं.०६,कोंढवा,पुणे हिचे लग्न तीचे पती आ.क्र.१ याचे बरोबर सन २००७ रोजी होवुन, ती मुलांसह सासरी नांदत असताना,तीचे पती व इतर नातेवाईक यांनी आपसात संगनमत करून,तीस वेळोवेळी हाताने मारहाण व शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी देवुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,फरजीन शेख हिस तीचे राहते घरी दि.१३/०९/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा.गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एच.एच.शेख ८२०८५०००८५ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ९४३/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३८,३३७,२७९,४२७,मो.वा.का.कलम १८४,११९,१७७,१३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | एडवर्ड लालापुया,वय-२४ वर्षे,रा.शिवनेरीनगर,कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपीत** | पाण्याच्या टँकरवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०९/२०२३ रोजी सकाळी ०७/३० ते ०८/०० वा.उंड्री ते हांडेवाडी रोडवर हरीओम फर्निचर दुकाना समोर,उंड्री,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी वनलालपेका रोल्हनेमा एन,वय-२५ याचेसह मोटार सायकल वरून त्यांचे राहते घरी जात असताना,नमुद इसमाने त्याचे ताब्यातील पाण्याच्या टँकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व मंतरवाडीच्या दिशेने भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादीचे मोटार सायकलला पाठीमागुन जबर ठोस मारून,त्यांना जखमी करून, वनलालपेका यांस गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,मोटार सायकलचे नुकसान करून,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विजय वगरे ७७२२०११२४५ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ९६/२०२३,भादविक ३८५, ३८७,३६४(अ), ३४१, ३२३, ५०४,५०६, ३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३२ वर्षे,रा.किरकटवाडी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | १.बाबुलाल लक्ष्मण मोहोळ,वय ४५ वर्षे,रा.सरडेबाग,उत्तमनगर,पुणे २.अमर नंदकुमार मोहिते वय ३९ वर्षे,रा.गणेशनगर,एरंडवणा,ओटा वसाहत,पुणे ३.प्रदिप प्रभाकर नलवडे,वय ३८ वर्षे, राजगुरु अपार्टमेंट,भुगाव,पुणे ४.अक्षय मारुती फड,वय २४ वर्षे,रा.अमर भारत सोसायटी, वारजे माळवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०९/२०२३ रोजी १९/०० वा.ते दि.१४/०९/२०२३ रोजी दुपारी १६/३० वा.चे दरम्यान रुद्र हॉटेल,देशमुखवाडी,सरडेबाग,उत्तमनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करुन,फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांना नमुद ठिकाणी बोलावुन घेवुन,नातेवाईकांना मारहाण करुन,त्यांचे गाडीत बसवुन त्यांचे अपहरण करुन आ.क्र.१ याचे उत्तमनगर,पुणे येथील राहते घरी नेवुन डांबुन ठेवुन,त्यांना शिवीगाळ व मारहाण करुन,फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांना जीवे ठार मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचेकडे १७ लाख रुपये खंडणी स्वरूपात मागणी केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. रोकडे ९९२१५६९०९६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**